जलस्वराज्य - २ कार्यक्रम.

(DLI#५) टंचाईग्रस्त गावे, वाडया-वस्त्या यांच्याकरीता सामुदायीक साठवण टाक्या उपाय योजनांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत सुधारणा बाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०७१६ /प्र. क्र. ९८/पापु-११

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१
दिनांक : १७ फ़ेब्रुवारी, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०७१६ / प्र. क्र. ९८/ पापु-११, दि. २६/०४/२०१७

२) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०७१६ / प्र. क्र. ९८/ पापु-११, दि. १४/०७/२०१७

प्रस्तावना :-

जलस्वराज्य- २ कार्यक्रमांतर्गत ५०० पेक्षा कमी लोकसंख्येची टंचाईग्रस्त गावे यांच्याकरिता उपाययोजना या उपक्रमांतर्गत टंचाई कालावधीसाठी सामुदायिक साठवण टाकी या योजनांना संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व २ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येवून सदर योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना देण्यात आली. प्रकल्प अंमलबजावणी तातडीने आणि कमी कालावधीत करण्यासाठी प्रचलित आर सी सी साठवण टाक्यांऐवजी विशेष प्रकारच्या, कमी कालावधीत उभारल्या जाऊ शकणाऱ्या आणि आर सी सी टाक्यांपेक्षा जास्त आयुषमान आणि बळकट असणाऱ्या मेटॅलिक टाक्या उभारण्याचा तसेच वेगवेगळया जिल्हास्तरावर येणाऱ्या किंमतीतील तफावत टाळण्यासाठी सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठीची निविदा प्रक्रिया राज्यस्तरावरुन सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष यांचेद्वारे करण्याचा धोरणात्मक निर्णय या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला होता. यानुसार सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष

यांचेस्तरावर शासनाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे दर कराराप्रमाणे दर निश्चितीसाठी ई- निविदा प्रक्रिया करुन मेटॅलिक स्वरुपाच्या सामुदायिक साठवण टाक्या व योजनेच्या अनुषंगीक बाबीच्या अंमलबजावणीसाठी पुरवठादारांची नियुक्ती करण्यात आली असुन भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या मार्फत सद्य:स्थितीत अंमलबजावणी करण्यात येत आहे.

२. तथापि, सदर योजनांचे प्राकलन व आराखडे, अंदाजपत्रके इत्यादी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद यांनी तयार केलेले असल्यामुळे तसेच भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्याकडे स्थापत्य अभियंता उपलब्ध नसल्यामुळे या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याचे व त्यामुळे प्रकल्प अंमलबजावणीस विलंब होत असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे. सदर उपक्रमासाठी जागतिक बँकेकडून प्राप्त करुन घ्यावयाची प्रतिपूर्ती मे २०१८ अखेर प्राप्त करुन घ्यावयाची असल्यामुळे जलद कार्यवाहीच्या दृष्टीने सदर उपक्रमाची अंमलबजावणी भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे कडून जिल्हा परिषद यांच्याकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जलस्वराज्य- २ कार्यक्रमांतर्गत ५०० पेक्षा कमी लोकसंख्येची टंचाईग्रस्त गावे यांच्याकरिता उपाययोजना या उपक्रमांतर्गत मेटॅलिक स्वरुपाच्या सामुदायिक साठवण टाक्या व योजनेच्या अनुषंगीक बाबी भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात येत आहेत. या अनुषंगाने संदर्भिय शासन निर्णय क्रं. १ व २ मध्ये सुधारणा करण्यात येत असून खालील कोष्टकामध्ये नमुद केल्याप्रमाणे यापुढे कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.	संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ व २ मधील परिच्छेद क्रमांक	सुधारित कार्यवाही
१	१. सदर योजनेची अंमलबजावणी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत करण्यात यावी.	सदर योजनेची अंमलबजावणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत करण्यात यावी.
२	३ (i) योजनेची १००% भौतिक कामे पुर्ण	योजनेची १००% भौतिक कामे पुर्ण

अ.क्र.	संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ व २ मधील परिच्छेद क्रमांक	सुधारित कार्यवाही
	झाल्यानंतर कंत्राटदार, ग्रामपंचायत व कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद व जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी संयुक्त पाहणी करुन योजना पुर्ण झाल्याची खात्री करावी. संबधित जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी योजना भौतिकदृष्टया पुर्ण झाल्याचे निर्गमित करावे.	झाल्यानंतर कंत्राटदार, ग्रामपंचायत व कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद व जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी संयुक्त पाहणी करुन योजना पुर्ण झाल्याची खात्री करावी. संबधित कार्यकारी अभियंता,ग्रा.पा.पु. जिल्हा परिषद यांनी योजना भौतिकदृष्टया पुर्ण झाल्याचा दाखला निर्गमित करावा.
३	५ (i) त्रयस्थ पडताळणी यंत्रणेकडुन (IVA) तपासणी करण्यापुर्वी योजनेच्या कामाचे / साहित्याचे गुणवत्तेच्या दृष्टीने तांत्रिक परिक्षण जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी करुन वेळोवेळी याबाबत चा अहवाल शासनास सादर करावा.	त्रयस्थ पडताळणी यंत्रणेकडुन (IVA) तपासणी करण्यापुर्वी योजनेच्या कामाचे / साहित्याचे गुणवत्तेच्या दृष्टीने तांत्रिक परिक्षण कार्यकारी अभियंता,ग्रा.पा.पु. जिल्हा परिषद यांनी करुन वेळोवेळी याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.
४	६ (i) योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या स्तरावरुन संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना वितरित केलेल्या निधीतुन या उपाय योजनां करिता खर्च करण्यात येईल.	योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या स्तरावरुन संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना वितरित करण्यात आलेला निधी तात्काळ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या योजनांच्या अंमलबजावणी करिता असलेल्या संयुक्त खात्यामध्ये योजनेच्या प्रमाणात हस्तांतरित करण्यात यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

अ.क्र.	संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ व २ मधील परिच्छेद क्रमांक	सुधारित कार्यवाही
		परिषद यांनी सदरचा निधी संबंधित योजनांच्या अंमलबजावणीकरिता खर्च करावा.
५	६ (ii) जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी गुणवत्ता परिक्षण पश्चात सादर केलेल्या देयकास संचालनालय, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे स्तरावरुन मान्यता देऊन अदायगी करण्यात येईल.	कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु., जिल्हा परिषद यांनी गुणवत्ता परिक्षण पश्चात सादर केलेल्या देयकास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्तरावरुन मान्यता देऊन अदायगी करण्यात येईल. या उपक्रमाचे लेखे स्वतंत्रपणे ठेवण्यात यावेत. या करिता जलस्वराज्य - २ कार्यक्रमासाठी नियुक्त लेखाधिकारी यांच्या सेवाचा वापर करावा. सदर उपक्रमात मुख्य वित्त व लेखा अधिकारी (CAFO) यांची भुमिका असणार नाही.

२. या व्यतिरिक्त उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे नव्याने सुचना देण्यात येत आहेत.

२.१ या उपक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पूर्णपणे संबधीत कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा), उप मुख्यकार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

२.२ उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी लागणारा अतिरिक्त निधी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांच्यास्तरावर असलेल्या अंमलबजावणी करिताच्या संयुक्त खात्यामध्ये शासन स्तरावरुन वितरीत करण्यात येईल.

२.३. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी योजनेच्या अंमलबजावणी करिता १००% तपासणी व गुणवत्ता इत्यादी करिता नियुक्त उपअभियंता व मोजमाप नोंदणी इत्यादी करिता जलस्वराज्य- २ कार्यक्रमातील अभियांत्रिकी तज्ञ यांच्या सेवांचा वापर करावा.

२.३. जलस्वराज्य- २ कार्यक्रमातील अभियांत्रिकी तज्ञ यांनी झालेल्या कामांचे मोजमाप घेणे (MB Recording), कामाची गुणवत्ता तपासणे, देयके तयार करणे इत्यादी कामे करावीत. कामावर देखेरेख ठेवण्यासाठी, मोजमाप रजिस्टर व देयके व गुणवत्ता इत्यादी ची १००% तपासणी करण्यास्तव जिल्ह्यातील सर्व साठवण टाक्या योजनेच्या अंमलबजावणी करिता एका उपअभियंता यांची संपूर्ण जिल्ह्यासाठी नियुक्ती करावी.

२.४. उपअभियंता यांनी सादर केलेली देयके कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी तपासुन देयक अदायगीसाठी शिफारस करणेत यावी.

२.५. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी शिफारस केलेली देयके, उप मुख्यकार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने पारित करावी. या देयकांची अदायगी उप मुख्यकार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या जलस्वराज्य-२ कार्यक्रमाच्या संयुक्त बँक खात्यात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतुन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांच्या मार्फत करण्यात यावी.

२.६. भुजल सर्वेक्षण आणी विकास यंत्रणेमार्फत अदायगी करण्यात आलेल्या देयकांच्या रकमेचे समायोजन संबधीत जिल्हा परिषदेने करावे व उर्वरीत रकमेची देयके उप मुख्यकार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांच्या स्तरावरुन अदा करण्यात यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201802171403291828 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUCHESH JAIVANSHI

Digitally signed by RUCHESH JAIVANSHI
DN: c=IN, o=Personal , CID - 4464799, 2.5.4.20=d667eb527ee31dc5a3a92192805da973bcaa80607ade85fef87112b96f56f1dc, postalCode=442605, st=Maharashtra, serialNumber=c3d94c036d3163a1465a4869ad480a242284a302a34ee37a6dbf1140479c8b94, cn=RUCHESH JAIVANSHI
Date: 2018.02.17 16:41:53 +05'30'

(रुचेश जयवंशी)
उपसचिव तथा प्रकल्प संचालक

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय आयुक्त, प्रादेशिक विभागीय कार्यालय, नाशिक.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१०. संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
११. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१३. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
१६. उपसंचालक, विभाग कोंकण, पुणे, नाशीक, ओरंगाबाद, अमरावती, नागपुर

१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, अहमदनगर, जळगाव, नांदेड, ओरंगाबाद, अमरावती, बुलढाणा, नागपुर व चंद्रपुर.

१८. उपमुख्य कार्यकारी आधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, अहमदनगर, जळगाव, नांदेड, ओरंगाबाद

१९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, अहमदनगर, जळगाव, नांदेड

२०. जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानीक, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, अहमदनगर, जळगाव, नांदेड,

२१. उपअभियंता, जिल्हा परिषद, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, अहमदनगर, जळगाव, नांदेड, ओरंगाबाद

२२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग संबंधीत कार्यासने

२३. निवड नस्ती (कार्यासन पापु-११), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, बेलापूर, नवी मुंबई.